# जिल्हाधिकारी परभणी यांचे न्यायालयात

सचिका क्र.2017/नपाप्र-04/निवडणुक/कावी

प्रकरण दाखल दि.08.06.2017
प्रकरणांत निकाल दि.05/11/2018

अर्जदार - 1. श्री अमृत अंबादास भदर्गे रा.मानवत
2. श्री शेख जावेद अ.सत्तार रा.मानवत

विरुध्द

गैरअर्जदार - श्रीमती कु-हाडे शितल गणेश रा.मानवत

**वाद - महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम 1965 कलम (9 अ) अन्वये अनर्ह ठरविणे बाबत.**

**(निर्णय)**

अर्जदार 1) श्री अमृत अंबादास भदर्गे रा.मानवत 2) श्री शे.जावेद अ.सत्तार रा.मानवत यांनी गैरअर्जदार श्रीमती कु-हाडे शितल गणेश यांचे विरुध्द नगर परिषदा,नगर पंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 9 अ अन्वये दि.08.06.2017 रोजी प्रस्तुत अर्ज सादर केला.

परंतु अर्ज सुनावणीस ठेवणेपूर्वी मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना पाठविलेल्या दि.04.07.2018 चे पत्रामध्ये रिट याचीका क्र.12524/2016 तसेच मा.सर्वोच्च न्यायालय येथील प्रलंबीत असलेल्या spl (civil) 29874-29875-/2016 चा संदर्भ देउन मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेता नगर परिषद नगर पंचायत व ग्रामपंचायतीच्या ज्या सदस्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांची निवड पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करून त्यांना सदस्य म्हणुन राहण्यास निरर्ह ठरवण्याबाबत चालु असलेली कार्यवाही तूर्त स्थगित ठेवण्यात यावी व मा. सर्वोच्च न्यायालयाचे पुढील आदेशापावेतो कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये असे निर्देश दिले आहेत. या बाबी विचारात घेता सदरील प्रकरण हे मा.सर्वोच्च न्यायालयामधील प्रकरण slp (civil) 29874–29875-/2016 या प्रकरणाच्या अंतिम निकाल लागेपर्यंत सुप्त अवस्थेत ठेवण्यात आले होते. आणि आता याबाबत दि.23.08.2018 रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय प्राप्त झालेला असुन सदरच्या याचिका फेटाळण्यात आल्याने सुप्त अवस्थेत ठेवलेल्या सदरील प्रकरणात निर्णय घेणेसाठी प्रकरण सूनावणीस घेण्यात आले व प्रस्तुत अर्जाची छाननी करण्यात आली आणि प्रकरणातील दोन्ही पक्षकारांना नोटीस निर्गमीत करुन नोटीस तामील करण्यात आल्या या कार्यालयाकडुन पाठविण्यात आलेल्या नोटीसच्या अनुषंगाने अर्जदार स्वत: हजर झाले तर गैरअर्जदार यांचेमार्फत ॲड.अनिरुध्द पांडे मानवत हे हजर होऊन त्यांनी वकीलपत्र सादर केले.

अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जात नमुद केलेले मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

नगर परिषद मानवतचे सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्र.03 अ नागरीकांचा मागास प्रवर्ग यासाठी राखीव असलेल्या पदासाठी श्रीमती शितल गणेश कु-हाडे यांनी आपले निवडणुक नामनिर्देशनपत्र भरले होते. सदर निवडणुकीसाठी उमेदवाराने जातवैधता प्रमाणपत्र निवडुन आल्याचे तारखेपासून (06) महिण्याचे मुदतीत दाखल करणे आवश्यक होते. परंतु गैरअर्जदार यांनी आपले जातवैधता प्रमाणपत्र मुदतीत सादर केले नाही.

श्रीमती शितल गणेश कु-हाडे यांनी निवडणुक लढविताना आपल्या निवडणुक नामनिर्देशनपत्रातील दिलेल्या शपथपत्रानुसार तसेच शासन परिपत्रक क्र.एमसीओ-2016/प्रक्र.46/नवि-14 मंत्रालय मुंबई दिनांक 28.04.2016 अन्वये त्यांचे सदस्य पद रद्द Disqualified करणे न्यायिकदृष्टया अंत्यंत गरजेचे असल्याचे नमुद करुन त्यांनी गैरअर्जदार यांचे सदस्यत्व रद्द करणे बाबत मागणी केली आहे.

प्रकरणात निर्णय घेणेसाठी दिनांक 08.10.2018 रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सुनावणी दरम्यान वादी श्री शेख जावेद अ.सत्तार यांनी आपले म्हणणे मांडले. तसेच वादी श्री अमृत अंबादास भदर्गे व 2) श्री.शेख जावेद अ.सत्तार यांनी आपले लेखी म्हणणे सादर केले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, गैरअर्जदाराने मानवत नगर परिषद कार्यालयाची सदस्यपद निवडणुक दि.27.11.2016 रोजी लढविली आहे. त्यानुसार सहा (06) महिने म्हणजे दि.01.06.2017 रोजी पर्यंत जातवैधता प्रमाणपत्र दाखल करणे गैरअर्जदार यांना बंधनकारक होते. परंतु या कालावधीत गैरअर्जदार यांनी आपले जातवैधता प्रमाणपत्र दाखल केले नाही. करीता मा.न्यायालयाचे निकाल व शासनाचे परिपत्रक याचे अवलोकन होवुन उपरोक्त गैरअर्जदार यांचे मानवत न.प.कार्यालयातील सदस्यपद रद्द करण्याची मागणी केली आहे. दरम्यान मुख्यधिकारी न.प.मानवत यांनी प्रतिवादी यांनी त्यांचे कार्यालयात दि.22.05.2017 रोजी दाखल केलेले जात पडताळणी कमेटीचे प्रलंबीत प्रमाणपत्र या कार्यालयात दाखल केले आहे.

तसेच मुख्याधिकारी नगर परिषद मानवत यांनी दि.02.06.2017 रोजी पत्र देवुन कळवले की, प्रतिवादी श्रीमती शितल गणेश कु-हाडे सदस्या न.प.मानवत यांनी जातवैधता प्रमाणपत्र विहीत कालावधीत प्राप्त न झाल्याने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे wp.937/2017 दाखल केलेले असुन त्याची प्रत पत्रा सोबत सादर केली आहे. मा.न्यायालयाचे निर्देशानुसार याचिकाकर्ते यांचे जातवैधता प्रमाणपत्र कार्यवाही प्रलंबीत असल्याने त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येऊ नये असे आदेशीत करण्यात आले होते.

सुनावणी दरम्यान प्रतिवादी यांचे विधीज्ञ यांनी युक्तीवाद सादर केला व नमुद केले की, त्यांचे पक्षकार हे नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक नोव्हेबर 2016 मध्ये न.प.मानवत येथील प्रभाग क्र. 3 (अ) नागरीकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या जागेसाठी निवडणुक लढविली व निवडुन आले. निवडणुक नामनिर्देशनपत्रासोबत नियमाप्रमाणे (06) महिण्याचे मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करणे बाबत शपथपत्र दाखल केले. त्याचवेळी जातवैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी समितीकडे प्रस्ताव सादर केला व त्यासाठी पाठपुरावा केला महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम 1965 कलम (9 अ) प्रमाणे निवडुन आल्यापासुन (06) महिण्याचे मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु जात पडताळणी समितीकडे बरीच प्रकरणे दाखल असल्याने जात वैधता प्रमाणपत्र विहीत कालावधीत प्राप्त न झाल्याने दाखल करता आले नाही. परंतु याबाबत प्रलंबित प्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच गैरअर्जदार यांचे विधीज्ञ यांनी पुढे असेही कथन केले आहे की, जात पडताळणी समितीकडुन दिनांक

24.08.2017 रोजी प्राप्त झालेले जातवैधता प्रमाणपत्र नगर परिषद मानवतचे कार्यालयात दाखल केलेले आहे. तसेच त्यांनी आपला युक्तीवाद मांडतांना हेही नमुद केले आहे की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 9 (अ) मध्ये सुधारणा केली असुन, आता 6 महिने ऐवजी 12 महिने मुदतीत प्राप्त झालेले वैधता प्रमाणपत्र विहीत मुदतीत प्राप्त झाले बाबत ग्राहय धरता येणार आहे. या बाबत त्यांनी अध्यादेशाची प्रत सादर केली व श्रीमती शितल गणेश कु-हाडे यांनी नवीन अध्यादेशातील तरतुदीनुसार मुदतीचे आंत म्हणजे 12 महिण्याचे आत जातवैधता प्रमाणपत्र सादर केले असल्याने त्यांना सदस्य पदावरुन दुर करण्यात येवु नये व अर्जदार यांची मागणी फेटाळुन लावावी अशी मागणी केली आहे.

प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकुण घेण्यात आले. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन करुन शहानिशा करण्यात आली.

महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम 1965 कलम 9 (अ) मध्ये महाराष्ट्र अध्यादेश क्र.20 दि. 27.09.2018 अन्वये जातवैधता प्रमाणपत्र दाखल करण्याची मुदत 06 महिण्याऐवजी 12 महिणे करण्यात आलेली असुन गैरअर्जदार श्रीमती शितल गणेश कु-हाडे यांनी दि.16.09.2017 रोजी म्हणजे 12 महिण्याचे मुदतीच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर केले असल्याची खात्री करण्यात आली. या सर्व बाबी विचारात घेता, गैरअर्जदार यांना मानवत नगर परिषद सदस्य पदावरुन अनर्ह ठरवता येणार नाही. या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. करीता प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

01 अर्जदार 1 श्री अमृत अंबादास भदर्गे रा.मानवत 02 श्री.शे.जावेद अ.सत्तार रा.मानवत यांचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

02 गैरअर्जदार श्रीमती शितल गणेश कु-हाडे यांना महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम 1965 कलम 9 (अ) मधील तरतुदीप्रमाणे निरर्ह ठरवता येणार नाही.

03 संबधीतास कळवावे व संचिका बंद करुन अभिलेख कक्षात दाखल करा.

**(पी.शिव शंकर)**
**जिल्हाधिकारी परभणी**

दिनांक :- 05 /11/2018
ठिकाण :- परभणी